ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# कलम 356 आणि 1989 नंतरचे केंद्र-राज्य संबंध

**प्रा. डॉ. ढोबळे डी. बी.**
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग , श्री छ.शिवाजी महाविद्यालय उमरगा.



**प्रस्तावना:-**

संघराज्य व्यवस्थेत सत्तेच्या दोन पातळया असल्यामुळे त्वरीत निर्णय व निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी अडचणीच्यावेळी होवू शकत नाही. हा संघराज्यव्यवस्थेतील अंगभूत दोष दुर करण्यासाठी अमेरिकन संविधानात अशी सोय केली की, न्यायालयीन निर्वचनाद्वारे केंद्र सरकारचे अधिकार वाढतील. घटनेतील अधिकार विभागणी आहे तशीस राहून अडचणीच्या वेळी केंद्रला पर्याप्त अधिकार प्राप्त व्हावेत आणि आव्हाणांचा मुकाबला करता यावा असा त्यांचा हेतू होता. भारतीय घटनाकारांनी राज्यव्यवस्थेसमोर अंतर्गत व बाह्य संकट आल्यास केंद्र सरकारला वाढीव अधिकार मिळतील याची संविधानातच व्यवस्था केली. राष्ट्रपतीच्या आणिबाणी विषयक अधिकारांची तरतूद अठराव्या भागात कलम 352 ते 360 मध्ये केली. एरव्ही संघराज्यात्मक असलेली राज्यव्यवस्था आणिबाबीची घोषणा होताच एकात्म बनते, घटकराज्य नाममात्र बनतात.

भारतात केंद्र आणि राज्य यांच्यातील वादाचा प्रमुख घटक म्हणून कलम 356 मध्ये केलेली राष्ट्रपती राजवटीच्या तरतूदीचा उल्लेख केला जातो. त्यामुळे कलम 356 हे भारतीय संविधानाला कलंक असून ते काढून टाकावे अशी मागणी अनेकवेळा केली गेली. राष्ट्रीय एकता आणि सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कलम 356 ची आवश्यकता आहे, मात्र त्यात विवेकसंगत सुधारांचीही गरज आहे. घटनाकारांनी भारताचा इतिहास, संघराज्यव्यवस्था, देशाची एकता, अखंडत्व, सुरक्षितता, भाषा, धर्म, प्रादेशिक विभिन्नता या सर्वांचा विचार करुन एक मजबुत राष्ट्र निर्माण करण्यासाठी आणिबाणीच्या इतर तरतूदींसह कलम 356 ची तरतूद केली. संविधानाने प्रत्येक राज्याचे परकीय आक्रमणापासून व सशस्त्र उठावापासून रक्षन करणे आणि प्रत्येक राज्याचे सरकार संविधानानुसार चालू राहील याची जबाबदारी केंद्र सरकारवर सोपविली आहे. कलम 356 मध्ये घटनेतील व्यवस्थेनुसार कारभार चालु राहण्याचे आश्वासन केंद्राकडून देता येण्यासाठी आवश्यक असलेल्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. एखाद्या राज्यात घटनेप्रमाणे शासन चालविणे अशक्य आहे अशी राष्ट्रपतीची राज्याच्या राज्यपालाकडून आलेल्या अहवालाच्या आधारे खात्री झाल्यास राष्ट्रपती राजवटीची घोषणा केली जाते. राज्याकडून जर केंद्राने दिलेल्या सुचनांचे नीट पालन किंवा अंमलबजावणी झाली नाही तर अशा कारणानेही राष्ट्रपती राजवट लागु करता येते, मात्र उच्चन्ययालयाच्या अधिकाराबाबत राष्ट्रपतिस असे अधिकार असणार नाहीत. मुळ संविधानानुसार राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव संसदेने पारित केल्यास सहामहिन्यासाठी राष्ट्रपती राजवट लागू करता येते. 44 व्या घटना दुरुस्तीने अशी तरतूद केली की, राष्ट्रपती रावटीची मुदत एकवर्षापेक्षा अधिक वाढवायची झाल्यास त्यासाठी दोन अटींची पुर्तता व्हावी लागेल. एक, संपुर्ण देशात किंवा दखाद्या भागात आणिबाणी लागू असली पाहिजे आणि दोन, निवडणुका घेण्यासाठी योग्य परिस्थिती नाही अशा दाखला निवडणूक आयोगाने दिला पाहिजे.

राज्यात राष्ट्रपती राजवटीची घोषणा झाल्यानंतर राज्याच्या कार्यकारी मंडळाची किंवा उच्च न्यायालय सोडून इतर न्यायालयांची सर्वसत्ता राष्ट्रपती स्वतःकडे घेवू शकतो, राज्याच्या विधीमंडळाचे अधिकार संसदेकडे जातील असे जाहीर करु शकतो. थोडक्यात राज्याची विधानसभा बरखास्त करुन राज्यासाठी कायदे करण्याचे अधिकार राष्ट्रपतींकडे किंवा त्याने सांगितलेल्या प्राधिकरणाकडे सोपिवण्याचा अधिकार संसदेला असतो. जेंव्हा लोकसभेचे अधिवेशन सुरु नसेल आणि त्या राज्याच्या खर्चाला संसदेची मान्यता मिळाली नसेल तेंव्हा देशाच्या संचित निधीतून खर्च करण्याचा आदेश राष्ट्रपती काढू शकतो. संसदेचे अधिवेशन सुरु नसताना गरज भासल्यास राष्ट्रपती राज्याच्या प्रशासनाखातर आध्यादेश काढू शकतो.

**कलम 356 चा वापर :-**

भारतातील घटनाकारांची अशी अपेक्षा होती की, कलम 356 चा वापर भारतीय संघराज्याच्या ऐक्य आणि सुरक्षिततेसमोरील संकटाचा सामना करण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत केला जाईल. व्यक्तीगत आणि पक्षीय स्वार्थापासून दूर राहून राष्ट्रहिताच्या पुर्ततेसाठी या कलमाचा वापर व्हावा. परंतु 1950 नंतरच्या काळात या कलमाचा अनेक

वेळा गैरवापर झाला. 'घटनात्मक तंत्र अयशस्वी' या नावाखाली या कलमाचा दुरुपयोग वारंवार झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनासमितीत असे म्हंटले की, केंद्राला उग्रशक्ती प्रदान करणारे कलम 356 एक 'मृतपत्र' म्हणूनच राहील, एक अंतिम साधन म्हणून या कलमाचा वापर भारताच्या राष्ट्रपती कडून करताना अतिशय सावधानता बाळगली जाईल[1]. राष्ट्रपति राजवटीची आवश्यकता, कारणे आणि आधार या विषयीचे कोणतेही मापदंड पाळले गेले नाहीत. राष्ट्रपती राजवटीसाठी राज्यातील परिस्थिती व आवश्यकते पेक्षाही राजकीय कारणांचा आधार घेतल्याचे जाणवते. त्यामुळे राज्यांमधून या कालमाचा तीव्र शब्दात विरोध करण्यात आला. अपवादात्मक परिस्थितीत या कलमाचा वापर व्हावा ही संविधान निर्मात्यांची इच्छा असतानाही वारंवार या कलमाचा राजकीय हेतूने गैरवापर झाला.

न्या. सरकारीया आयोाने आपल्या अहवालात 1988 पर्यंतच्या घटनांचा आढावा घेवून असे स्पष्ट केले की, कलम 356 चा गैरवापर भारतीय संघराज्यात अनेक वेळा झाला. संविधानकर्त्यांचा दृष्टीकोन लक्षात घेता कलम 356 भारतीय संघराज्यातील घटनात्मक व्यवस्था अबाधित राखण्यासाठी किंवा संघराज्याच्या एकत्त्वासाठी उपयुक्त ठरेल, मात्र या कलमाचा वापर घटकराज्यांना नामशेष करण्यासाठी केंद्रशासनाने केला. सरकारीया आयोगाने केंद्र-राज्य समन्वयाच्या दृष्टीने कलम 356 चा वापर अपवादात्मक स्थितीत व्हावा अशी शिफारस केली. ज्याची चर्चा मागील प्रकरणात विस्ताराने केली आहे. संविधानकर्त्यांचा दृष्टीकोन व सरकारीया आयोगाच्या सिफारशी 1989 नंतरही फारशा गांभिर्याने घेतल्या नाहीत. म्हणून 1989 च्या भारतीय संघराज्यातील केंद्र-राज्य यांच्यात तनाव निर्माण करणारा घटक म्हणून कलम 356 या उल्लेख केला जातो. पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या पासून पूढे 2013 पर्यंत एकूण 36 वेळा राष्ट्रपती राजवटीचा प्रयोग झाला. या काळात घटकराज्यांमध्ये लादलेली राष्ट्रपती राजवट सरकार अल्पमतात आल्यामुळे, आघाडीत फूट पडल्यामुळे, राज्यातील कायदा सुव्यवस्थेमुळे लागू केली होती.

सरकारीया आयोगाच्या अहवालानंतर ही केंद्र-राज्य समन्वयावर आधारित संघीय व्यवस्था प्रस्थापित करण्याच्या दिशेने प्रयत्न झाले नाहीत. आयोगाने कलम 356 चा वापर अंतीम पर्याय म्हणून वापरला जावा असे सुचविले असतानाही या शिफारशींकडे फारसे गांभिर्याने लक्ष दिले गेले नाही. परिणामी 1989 ते 2013 पर्यंत एकुण 36 वेळा राष्ट्रपती राजवटीचा प्रयोग झाला. ज्या ज्या वेळी राष्ट्रपती राजवटींचा प्रयोग विभिन्न घटकराज्यांमधून झाला त्यावेळी राष्ट्रपती राजवटी शिवाय दुसरा पर्यायच उपलब्ध नव्हता अशी परिस्थिती त्या घटकराज्यांमध्ये होती काय ? या प्रश्नाचा शोध घेणे केंद्र - राज्य समन्वयाच्या आणि स्वस्थ संघराज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. सहकार्याधिष्टित संघराज्यवादाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने सरकारीया आयोगाच्या शिफारशींचा उपयोग झाला आहे काय ? याही प्रश्नाचा मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरते त्यासाठी 1989 नंतर अर्थात पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांच्या कार्यकाळापासून लागू केलेल्या राष्ट्रपती राजवटींची आवश्यकता आणि संवैधानिकता तपासून पहावी लागते.

नोव्हेंबर 1989 ते 1991 या काळातील व्ही. पी. सिंग आणि चंद्रशेखर यांचे अप्लमतातील सरकार केंद्रात सत्तारुढ होते. या अडिच वर्षाच्या काळात केंद्र-राज्य संबंधात तनावाचे प्रसंग उद्‌भवले. राज्यपाल आणि कलम 356 बाबतचे केंद्रशासनाचे निर्णय दोषपूर्ण होते. नोव्हेंबर 1989 च्या नवव्या लोकसभेच्या निवडणूकीत कोणत्याच पक्षाला बहूमत न मिळाल्याने भा.ज.प. व अन्य पक्षाच्या पाठींब्याने जनता दलाचे व्ही. पी. सिंग यांनी सरकार स्थापण केले. मात्र भाजप ने पाठिंबा काढून घेतल्याने 11 महिन्यात सरकारला जावे लागले. त्यानंतर काँग्रेसच्या पाठिंब्याने चंद्रशेखर पंतपधान झाले. मात्र इंदिरा काँग्रेस आणि चंद्रशेखर यांच्यातील मतभेदामुळे त्यांनी मार्च 1991 मध्ये आपला राजीनामा दिला. जून 1991 पर्यंत लोकसभा निवडणूका संपन्न होईपर्यंत ते काळजीवाहू सरकारमध्ये होते. या दोन्ही पंतप्रधानांचा कालखंड संसदीय लोकशाही आणि संघराज्य व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य राहिला नाही. ही दोन्ही सरकारे अल्पमतातील असली तरी या अडिच वर्षाच्या काळात आठ घटक राज्यांमध्ये कलम 356 चा प्रयोग केला गेला. जम्मू-कश्मिर, कर्नाटक, हरियाणा, मेघालय, गोवा, पाँडेचेरी, आसाम आणि तामिळनाडू या आठ घटक्राज्यांमधील राष्ट्रपती राजवटींवरुन केंद्रशासनावर अनेकंगाने टिका झाली. जम्मू काश्मिरमध्ये राष्ट्रपती राजवट जुलै 1990 मध्ये राज्यपाल शासन झाल्यानंतर लागू करण्यात आले. जम्मू कश्मिरच्या संविधानात 6 महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी राज्यपाल शासन लागू करता येत नाही आणि सरकार राज्यातील दहशतवादी कारवाया थांबविण्यात असमर्थ होते. यासाठी प्रशासन क्रियाशिल ठेवण्यासाठी नवीन राज्यपाल जगमोहन यांची नियुक्ती करण्यात आली. हेच कारण पूढे करुन मुख्यमंत्री श्री. फारुख अब्दूला यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. अशा परिस्थिती कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली जुलै 1990 मध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली. राज्यातील वाढत्या दहशतवादी कारवायांमुळे राष्ट्रपती राजवट एक परंपराच बनली होती. सहा वर्षाच्या राष्ट्रपती राजवटीनंतर ऑक्टोबर 1996 मध्ये निवडणूका घेण्यात आल्या. नॅशनल कॉन्फरन्सला बहूमत मिळाल्याने. डॉ. फारुख अब्दुला मुख्यमंत्री झाले. 14 नोव्हेंबर 1990 मध्ये गोव्यात पक्ष बदलाच्या कारणामुळे सरकार अल्पमतात आल्याने तिथे राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.[2] कर्नाटक मध्ये राष्ट्रपती राजवट विचित्र स्वरुपात लागू करण्यात आली. ज्यास कोणताही पुर्वाधार नव्हता. 225 सदस्यांच्या सभागृहात काँग्रेसचे 179 सदस्य होते. मुख्यमंत्री विरेंद्र पाटील बऱ्याच दिवसापासून आजारी असल्याने प्रशासनाचे कामकाज पाहू शकत नव्हते. अशा परिस्थितीत काँग्रेस नेतृत्त्वाने विधीमंडळ पक्षाची बैठक बोलावून नव्या नेत्याची निवड करण्याचे सुचित केले. विधीमंडळातील सदस्यांनी नव्या नेत्याची निवड केल्यानंतर राज्यपालाला नव्या नेत्याला सरकार स्थापण करण्यासाठी आमंत्रीत करावे अशी विनंती करण्यात आली. परंतु राज्यपाल भानुप्रतापसिंह यांनी काँग्रेस विधीमंडळ सदस्यांचा हा निर्णय मानण्यास नकार दिला आणि असे म्हटले की, काँग्रेस विधीमंडळ पक्षाची बैठक अवैध होती. कारण काँग्रेस पक्षाच्या घटनेनुसार श्री. विरेंद्र पाटील यांना 7 दिवसांची नोटीस पाठविल्यानंतरच बैठक बोलावता येते. श्री. पाटील यांनी विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत भाग न घेता आपल्या पाठीशी बहूमत असल्याचा दावा करुन विधानसभा भंग करण्याची शिफारस केली. अशा परिस्थितीत राज्यपालांनी राष्ट्रपती राजवट लागू करण्याची सिफारस केली. त्यानंतर 11 ऑक्टोबर 1998 ला राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. या निर्णयावर सर्व स्तरातून टीका करण्यात आली. राज्यात काँग्रेस पक्ष बहूमतात होता कोणतीही राजकीय अस्थिरता नव्हती. राज्यपालांना काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नव्हती. बहुमत धारी पक्ष हवे तेव्हा आपला नेता बदलू शकतात. राज्यपाल भानूप्रतापसिंह यांनी आंध्रप्रदेशातील रामराव सरकार बरखास्त करण्यात तेथील राज्यपाल श्री. रामलाल यांनी घेतलेल्या भूमीकेसारखाच व्यवहार केला. आंध्रप्रदेशातील राज्यपालांच्या कृतीचा राष्ट्रीय मोर्चाच्या सदस्यांनी त्यावेळी निषेध केला होता. मात्र सत्तेवर आल्यानंतर कर्नाटकातील राज्यपालांच्या कृतीचे समर्थन केले. राज्यपाल पदाचा हा सारासार दुरुपयोग होता. पूढे 8 दिवसानंतर राष्ट्रपती राजवट समाप्त करण्यात आली व नव्या नेत्याला मुख्यमंत्री पदाची शपथ दिली गेली.[3]

कर्नाटक प्रमाणेच नोव्हेंबर 1990 मध्ये आसाम मध्ये उल्फाच्या दहशतवादी कारवायांमुळे स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणूका शक्य नसल्याच्या कारणावरुन राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. विधानसभेच्या कार्यकाल 8 जानेवारी 1990 ला संपणार होता. केंद्र सरकारच्या सुचनेनंतरही आसाम सरकारने राज्यातील 8 जिल्हे अशांत घोषीत केले नाहीत. परिणामी राज्यातील दहशतवादी कारवाया थांबविण्यासाठी केंद्रीय सुरक्षाबल तेथे पाठविण्यात आले नाही. पकडलेल्या आतंकवाद्यांवर कारवाई करण्यात आली नाही. असे असूनही राष्ट्रीय मोर्चा सरकारने मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांचे सरकार बरखास्त केले नाही कारण ते राष्ट्रीय मोर्चाचे सहयोगी होते. लिट्टेच्या हिंसक कारवाया थांबविण्यात आणि सार्वजनिक व्यवस्था सुरक्षित ठेवण्यात तामिळनाडू सरकारला अपयश आल्याचे कारण पूढे करुन 31 जानेवारी 1991 मध्ये तामिळनाडू मध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली गेली. त्यावेळी केंद्रात काँग्रेसच्या पाठिंब्याने चंद्रशेखर यांचे सरकार होते. काँग्रेसच्या दबावाखाली येवून केंद्र सरकारने राष्ट्रपती राजवट लागू केल्याची टीका केली गेली. कारण राज्यपाल सुरजित सिंग बर्नाला यांनी राष्ट्रपती राजवटी विषयी कोणताही अहवाल पाठविला नव्हता. अशा परिस्थितीत केंद्रशासनाने केलेली कार्यवाही उचित नव्हती. या काळात जानेवारी 1991 मध्ये पाँडेचेरी आणि एप्रिल 1991 ला हरियाणात पक्षांतराच्या समस्येमुळे सरकार अल्पमतात आल्याने राष्ट्रपती राजवट लागू केली होती.[4] अर्थात व्ही. पी. सिंग आणि चंद्रशेखर यांच्या काळात राज्यपाल पदाचा दुरुपयोग करुन राजकीय हेतूने राष्ट्रपती राजवटीचा प्रयोग झाला. त्यामुळे हा काळ केंद्र राज्य समन्वयाच्या दृष्टीने अनुकुल नव्हता.

मे जून 1991 मधील लोकसभेच्या मध्यावधी निवडणूकानंतर इंदिरा काँग्रेसचे श्री नरसिंहराव पंतप्रधान झाले. नरसिंहराव यांचा कार्यकाल केंद्र-राज्य प्रशासकीय संबंधाच्या दृष्टीने समन्वयाचा नव्हता. कारण सत्तेवर आल्यानंतर कलम 356 चा विभिन्न राज्यांमध्ये झालेला प्रयोग राजकीय हेतूने घेतलेला आढळतो. ऑक्टोबर 1991 मधील मेघालय, जानेवारी 1992 मधील मणिपूर आणि एप्रिल 1992 मधील नागालँड या राज्यांमध्ये लागू केलेल्या राष्ट्रपती राजवटी विचित्र परिस्थितीत लागू केल्या होत्या. नरसिंहराव सरकारच्या एक वर्षाच्या काळातील ह्या राष्ट्रपती राजवटींना न्यायालयातही आव्हान दिले गेले. 12 ऑक्टोबर 1991 ला मेघालयात जेव्हा विधानसभेत सरकार बहुमत सिद्ध करीत होते तेंव्हा अध्यक्षांनी 4 आमदारांना पक्षांतर बंदी कायद्या अंतर्गत अपात्र घोषित करुन स्वत: निर्णायक मत देवून सरकार पाडले. सत्ताधारी अणि विरोधी पक्षाला समसमान मते असताना अध्यक्षांनी विरोधी मतदान करुन सरकारला बहुमत न मिळाल्याने बैठक स्थगित केली. या विरुद्ध 5 आमदारांनी सर्वोच्च न्यायालयात याचीका दाखल केली. या 5 सदस्यांना सभाग्रहाच्या बैठकीत भाग घेवू देण्याचा आदेश देवूनही अध्यक्षांनी हा निर्णय मानण्यास नकार दिला. त्यामुळे न्यायालय आणि कायदेमंडळ यांच्यात संघर्षाची स्थिती निर्माण झाली. अशा परिस्थितीत राज्यपालांनी राष्ट्रपती राजवटीची सिफारस करुन संघर्षाची स्थिती टाळण्याचे काम केले. 7 जानेवारी 1992 ला मणिपुरचे मुख्यमंत्री आर. के. रणवीर सिंह यांच्या नेतृत्त्वातील सरकार 5 सदस्यांनी पाटींबा काढून घेतल्यामुळे 60 सदस्यांच्या सभागृहात सत्ताधारी आघाडीचे संख्याबळ 24 एवढे झाले. त्यामुळे राष्ट्रपती राजवट लागू केली गेली. मात्र मुख्यमंत्र्यांनी विधानसभा भंग करण्याचा राज्यपालांना दिलेला सल्ला त्यांनी मानला नाही. एप्रिल 1992 मध्ये राष्ट्रपती राष्ट्रपती राजवट समाप्त करुन काँग्रेस पक्षाला सरकार स्थापन करण्याची संधी दिली. 4 एप्रिल 1992 मध्ये नागालँड मध्ये ही अनावश्यक परिस्थितीत राष्ट्रपती रावजटीचा निर्णय घेतला गेला. मुख्यमंत्र्यांनी विधानसभा भंग करुन निवडणूका घेण्याची राज्यपालांना केलेली सिफारस त्यांनी मान्य करुन नविन सरकार स्थापन होईपर्यात काम पाहण्यास सांगितले. मात्र त्यानंतर राज्यपालांनी केंद्राकडे राज्यातील कायदा सुव्यस्थेची दुरावस्था आणि राजकीय अस्थिरते विषयीचा अहवाल पाठविल्याने तेथे राष्ट्रपती राजवट लागू केली गेली.[5]

6 डिसेंबर 1992 साली उत्तरप्रदेशातील आयोध्या येथे बाबरी मस्जिद उद्धस्त केल्यामुळे कल्याणसिंग यांच्या नेतृत्त्वातील भारतीय जनता पक्षाचे सरकार बरखास्त करण्यात आले. राममंदिर-बाबरी मस्जिद विवादामुळे बिघडलेली कायदा व सुव्यवस्था पूर्वपदावर आणण्यात सरकार असफल ठरले होते, या घटनेची नैतिक जबाबदारी आपल्यावर घेवून मुख्यमंत्री कल्याणसिंग यांनी राज्यपालांकडे आपला राजीनामा पाठविला. म्हणजे बरखास्तीच्या प्रश्नच ठरत नाही. आयोध्येतील घटनेच्या परिणाम स्वरुप 15 डिसेंबर 1992 ला केंद्रातील नरसिंहराव सरकारने राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेशातील भाजपा शासित राज्यांमधील सरकारे बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू केली आणि या तीन्ही राज्यातील विधानसभा देखिल भंग करण्यात आल्या. यातीन्ही राज्यातील भाजपा शासीत सरकारे बरखास्त करण्याचा निर्णय संबधीत राज्यांच्या राज्यपालांच्या अहवालावर आधारित होता. राज्यातील वर्तमान सरकारे अस्तित्त्वात असल्यास संवैधानिक शासन अशक्य आहे. असा समान अहवाल तिन्ही राज्यांच्या राज्यपालांचा होता. काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी ही सरकारे बरखास्त करण्यासाठी नरसिंहराव यांच्यावर दबाव वाढविला होता. बाबरी मस्जिदींच्या वादानंतर राष्ट्रीय स्वयसेवक संघ, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल इत्यादि धार्मिक संगठनांशी संबंधीत असल्याचे भाजप सरकारांनी स्वत: मान्य केले असल्यामुळे अशा व्यक्तींना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही कारण ही धार्मीक संगठने केंद्राद्वारा प्रतिबंधीत होती. शिवाय या प्रतिबंधीत धार्मीक संगठनांवर या राज्यसरकारांनी उचित कार्यवाही केली नाही. या आधारावर तेथे राष्ट्रपती राजवट लागू केली गेली. तेथील विधानसभाही भंग केल्या गेल्या. या घटनाक्रमावर त्वरीत निर्णय घेताना तीन्ही राज्यातील राज्यपालांना कलम 356 च्या अधिन अहवाल मागितला गेला. तीन्ही राज्यपालांचा अहवाल एक समान होता. वास्तविकता या अहवालांच्या प्रति दिल्लीत तयार केल्या होत्या आणि राज्यपालांनी त्यावर केवळ स्वाक्षरी केली होती.[6] या अहवालात राज्यातील संवैधिानिक यंत्रणा कोलमडल्याची शंका व्यक्त केली होती आणि राज्यांचे मुख्यमंत्री केंद्राचे आदेश पाळत नाहीत. असा आरोप केला होता. या राज्यांमधील राष्ट्रपती राजवटीला कोणताही ठोस आधार नव्हता. उलट आयोध्या घटनेनंतरची गुजरात, महाराष्ट्र आणि आंध्रपेदेशातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती भाजप शासीत राज्यांपेक्षा वाईट होती. अर्थात हा कलम 356 चा सरासर दुरुपयोग होता. केंद्र सरकरने सरकारीया आयोगाच्या शिफारशींकडे ही लक्ष दिले नाही. आयोगाने आपल्या अहवालात कलम 356 चा प्रयोग अंतिम पर्याय म्हणून केला जावा अशी सिफारस केली होती, मात्र याकडे लक्ष न देता नरसिंहराव सरकारने ठोस आधारांच्या अभावी तीन्ही राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवटी लागू केल्या, ज्या न्यायालयानेही असंवैधानिक ठरविल्या होत्या. मध्यप्रदेश उच्य न्यायालयाच्या इंदौर खंडपीठाने राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेशातील सरकारची बरखास्ती आणि विधानसभा भंग करण्याचा केंद्रसरकारच्या निर्णयाला अव्हान देणाऱ्या याचिकेवर पंतप्रधान आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री सुंदरलाल पटवा यांना नोटीस देवून 15 दिवसात उत्तर मागितले. या याचिकेत असे म्हटले की, सरकारच्या बरखास्तीचा आदेश अविवेकी, अन्यायपूर्व व भेदभाव करणारा आहे, या आदेशाने केवळ सरकार बरखास्त झाले नाही, तर जनतेलाही सजा दिली गेली आहे. हा आदेश देशातील संघीय संरचनेचा घात करणारा आहे. केंद सरकारने घेतलेला निर्णय भेदभावपूर्ण असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध असणे हा सरकार बरखास्तीचा आधार असू शकत नाही असे याचिकेत नमुद करण्यात आले होते. 4 जानेवारी 1993 ला राज्यस्थान उच्चन्यायालयात आयोध्या प्रश्नासंबंधी दाखल झालेल्या याचिकेत राजस्थानातील राष्ट्रापती राजवटीला आव्हान दिले होते. सरकारचा कोणताही

धर्म असत नाही. मात्र राजकीय पक्षांनी प्रजातंत्र आणि धर्म निरपेक्षतेच्या सिद्धांताचा गळा घोटाला आहे. म्हणून काँग्रेस, भाजपा, जनता दल आणि साम्यवादी पक्षांना बंदी घातली जावी असे याचिकेत नमुद केले गेले. मध्यप्रदेशातील उच्चन्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर निर्णय देताना न्यायालयाने राष्ट्रपती राजवटीसंबंधीचा राष्ट्रपतीचा आदेश अवैध आणि कलम 356 च्या परिघाबाहेरचा असल्याचे म्हटले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, राज्य सरकार राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर प्रतिबंध घालण्यातअसफल ठरले आहे असा राज्यपालाच्या अहवालात उलेख नाही, काही ठिकाणी हिंसक घटना घडल्या याचा अर्थ कायदा सुवव्यवस्था बिघडली असा होत नाही, त्यामुळे न्यायालयाने 15 डिसेंबर 1992 चा राष्ट्रपती राजवटीचा आदेश अवैध ठरवून मध्यप्रदेशातील सरकार बरखास्ती व विधानसभा भंग करण्याचा निर्णय रद्द करुन त्यांना पून्हा अस्तित्त्वात आणले जावे असा निर्णय दिला.[7] या निर्णया विरुद्ध केंद्र सरकारला सर्वोच्च न्यायालयात जाण्यासाठी दोन आठवड्यांचा अवधी देखिल दिला. यावेळी भाजप नेत्यांनी तत्कालीन बडतर्फ मुख्यमंत्र्यांना पुन्हा पदभार देण्याची मागणी केली. तर काँग्रेसने उच्च न्यायालयाचा निर्णय आश्चर्यजनक असल्याचे म्हटले. केंद्र सरकारने 12 एप्रिल 1993 ला सर्वोच्च न्यायालयात अव्हान दिले. 16 एप्रिल 1993 ला सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचाच्या निर्णयाला स्थगिती दिली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्यस्थान, हिमाचल प्रदेशातील उच्च न्यायालयातील याचिकावरील कार्यवाहिला सुद्धा स्थगिती देवून राष्ट्रपती राजवटीशी संबंधी कर्नाटक व नागालँड मधील घटनांसंबंधी निर्णय देण्याकरिता 9 न्यायाधिशांचे एक पीठ स्थापन केले. ह्या सर्व याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने एकत्रीत निर्णय दिला. जो वाद एस. आर. बोम्मई विरुद्ध भारतीय संघ या नावाने ओळखला जातो.

पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात कलम 356 चा शेवटचा प्रयोग उत्तर प्रदेशात 19 ऑक्टोबर 1995 ला झाला. भाजपाने समर्थन काढून घेतल्याने मायावतीचें बसपा सरकार अल्पमतात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राज्यपालांनी विधानसभा भंग केली नाही कारण राष्ट्रपती राजवटीला संसदेची मान्यता मिळाल्यानंतरच विधानसभा भंग करता येईल असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होता. न्यायालयाच्या निर्णयाचा परिणाम असा झाला की, राजकीय पक्षांमध्ये सरकार स्थापण करण्यासाठी स्पर्धा सुरु झाली, त्यासाठी पक्षांतर घडवून आणले जावू लागले. जेंव्हा सर्वच पक्षांनी सरकार स्थापण्यासाठी नकार दिला अशा स्थितीत विधानसभा अस्तित्त्वात ठेवणे उचित नाही असे मानून राज्यपालांनी संसदेच्या मान्यतेशिवाय विधानसभा भंग केली. अर्थात पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात 8 घटकराज्यात 10 वेळा कलम 356 चा प्रयोग केला गेला. या काळातील राष्ट्रपती राजवटी त्रिपुरा आणि 1995 मधील उत्तरप्रदेशचा अपवाद वगळता राजकीय हेतूने प्रेरित होत्या. पंतप्रधान पदाची शपथ घेतल्या नंतर पंतप्रधान नरसिंहराव यांनी केंद्र-राज्य संबंधात संतुलन साधण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे आश्वासन दिले होते. मात्र या काळातील राजकीय हेतूने प्रेरित कलम 356 चा प्रयोग केंद्र-राज्य यांच्यात तणाव निर्माण करणारा ठरला.

फ्रंट लाईन या सात्पाहिकाचे संपादक एन. राम यांनी पंतप्रधान परसिंहराव यांची मुलाखत घेतली. केंद्र-राज्य संबंधावर बोलताना नरसिंहराव यांनी असे म्हंटले की, राज्यांमध्ये कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी केंद्रीय स्तरावरुन त्यांच्याशी भेदभाव केला जाणार नाही. या मुलाखतीत नरसिंहरावांनी स्पष्ट केले की, कलम 356 च्या प्रयोगाविषयी पूर्ण संतुष्ट होणार नाही तो पर्यंत या कलमाचा प्रयोग करणार नाही अशी हमी पंतप्रधानांनी दिली.[8] 29 ऑगस्ट 1992 च्या भारत छोडो आंदोलनाच्या स्वर्ण जयंती समारंभात बोलताना नरसिंह रावांनी सर्व पक्षांना अवाहन केले की भेदभाव, वैमनस्याचा मार्ग सोडून केंद्र व राज्य यांच्यात परस्पर समन्वय, सामंजस्य प्रस्थापित करण्यासाठी सहकार्य करावे. यावेळी त्यांनी अशी घोषणा केली की, कोणत्याही राज्य सरकार पाच वर्षाच्या आधी बरखास्त केले जाणार नाही. कार्यकाल समाप्तीनंतर निवडणूकीत जनता निर्णय घेईल. या घोषणेचे सर्व राज्यांनी स्वागत केले आणि केंद्र राज्य समन्वयाचा कार्यकाल आरंभ होईल अशी अशा व्यक्ती केली. मात्र नरसिंहराव यांच्या काळातही राष्ट्रपती राजवटीचा व राज्यपाल पदांचा गैरवापर राजकीय हेतून केला गेला हे उपर्युक्त घटनांवरुन सिद्ध होते. म्हणून हा काळ केंद्र-राज्य समन्वयाचा होता असे म्हणता येत नाही. असे असले तरी पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात पंजाब मधील आतंकवाद, कश्मिर मधील कायदा व सुव्यवस्था व दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाला घटकराज्याचा दर्जा देणारे महत्त्वाचे निर्णन घेतले गेले. शिवाय देशाची आर्थिक स्थिती सुधारण्याचे महत्त्वाचे काम झाले ते नाकारता येत नाही.

संयुक्तमोर्चा सरकारच्या काळात प्रादेशिक पक्षांचा प्रभाव केंद्रशासनावर होता. या काळातही कलम 356 चा प्रयोग केला गेला. ऑक्टोबर 1995 पासून सूरू असलेली उत्तर प्रदेशातील राष्ट्रपती राजवट ऑक्टोबर 1996 च्या विधानसभा निवडणूकांनंतर कायम ठेवली होती. कारण विधानसभेच्या सार्वत्रीक निवडणूकीत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने राज्यपालांनी कोणत्याही पक्षाला सरकार स्थापण करण्यासाठी आमंत्रीत केले नाही. भाजपा सर्वात मोठा पक्ष असूनही राज्यपालांनी त्यांना सरकार स्थापण करण्याची संधी दिली नाही. राज्यपालांचा हा निर्णय घटनात्मकतेपेक्षा राजकीय स्वरुपाचा होता. स्पष्ट बहुमताच्या अभावी विधानसभेतील सर्वात मोठ्या पक्षाला सरकार स्थापण करण्यासाठी आमंत्रीत कराण्याच्या परंपरेला राज्यपालांनी छेद दिला आणि केंद्र सरकार कडे राष्ट्रपतीशासनासंबंधी अहवाल पाठवला. या अहवालात विधानसभा भंग न करता निलंबिन करण्याची शिफारस केली आणि असे म्हटले की, भाजपने सर्वात मोठा पक्ष म्हणून सरकार स्थापन करण्याचा दावा केला, परंतू बहूमत सिद्ध करण्याविषयीचे कोणतेही विवरण दिले नाही. दुसरीकडे बहूजन समाज पार्टी, काँग्रेस आणि संयुक्त मोर्चाने कोणत्याही परिस्थितीत भाजपाला समर्थन न देण्याचा निर्णय घेतला होता. अशा परिस्थित राज्यपालांनी राष्ट्रपती शासनाची सिफारस केली. केंद्र सरकारने राज्यपालाच्या या निर्णयाचे समर्थन केले आणि 17 ऑक्टोबर 1996 ला पून्हा उत्तरप्रदेशात राष्ट्रपती राजवट लागू केली. सप्टेंबर 1996 मध्ये गुजरात मध्ये अशाचप्रकारे राष्ट्रपती राजवट लागू केली. गुजरात मध्ये प्रथम राज्य सरकारला बूमत सिद्ध करण्याची संधीच दिली नाही. जेंव्हा संधी दिली तेंव्हा सरकारने बहूमत सिद्ध करुन दाखविले. मात्र राज्यपालानी सरकारच्या विश्वसनियतेवर शंका घेवून केंद्राकडे राष्ट्रपती राजवटीची शिफारस केली. सरकारने बहूमत सिद्ध केल्यानंतर 24 तासाच्या आत राज्यसरकार बरखास्त करण्याची देशातील ही अपवादात्मक घटना होती. गुजरात मध्ये सुरेशभाई मेहता यांच्या सरकारने बहूमत मिळविले मात्र या दरम्यान राज्यात हिंसक घटना घडल्या याच घटनांचा आधार घेत राज्यात राष्ट्रपती राजवट लागु केली गेली. यावेळी विधानसभा निलंबित केली होती येथील राष्ट्रपती राजवट 23 ऑक्टोबर 1996 ला समाप्त करुन शंकरसिंग वाघेला यांच्या नेतृत्त्वातील सरकार सत्तेवर आले. पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या कार्यकाळात लागू केली उत्तर प्रदेशातील राष्ट्रपती राजवट वादग्रस्त ठरली. उत्तर प्रदेशातील ही राष्ट्रपती राजवट देशाच्या लोकतांत्रीक इतिहासातील न्यायालयाने असंवैधानिक ठरविलेली पाहिली घटना होती. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने 19 डिसेंबर 1996 ला दिलेल्या ऐतिहासिक निर्णयात उत्तरप्रदेशात पून्हा राष्ट्रपती शासन लागू करण्याची 17 ऑक्टोबर 1996 ची अधिसुचना रद्द ठरविली. नंतर या अधिसुचनेला संसदेत मान्यता मिळविण्याच्या निर्णयाला घटनाबाह्य घोषित करुन राजकारणाशी प्रेरित म्हटले आहे. परंतु न्यायालयाने घटनात्मक संकटापासून वाचण्यासाठी निर्णयाला स्वत: 25 डिसेंबर 1996 पर्यंत स्थगित ठेवले आणि हा निर्णय 26 डिसेंबर 1996 पासून लागू असेल असे म्हटले.[9] सर्वोच्च न्यायालयाने 20 डिसेंबर 1996 ला अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देताना असे म्हटले की, ह्या प्रकरणाचा निपटारा होईपर्यंत राज्यविधानसभा भंग न करण्याची

सिफारश केली. कलम 356 (5), (6) नुसार राज्यात राष्ट्रपती शासन एक वर्षाच्या अधिक काळासाठी वाढविता येवू शकते, जेव्हा निवडणूक आयोग प्रमाणित करेल की, वर्तमान परिस्थितीत राज्यात निवडणूका घेणे शक्य नाही. या घटनेत राज्यपालांनी घटनेनुसार कार्यवाही केली नाही. त्यांनी निवडणूक आयोगाशी विधानसभा गठीत करण्यासाठी सिफारस केली नाही. नेता निवडीसाठी विधानसभेची बैठक बोलावली नाही. त्यांनी असे करणे घटनेनुसार आवश्यक होते. 15 मार्च 1997 साली उत्तरप्रदेशात राष्ट्रपती शासनाचा कालावधी 17 एप्रिल पासून 6 महिने वाढविण्याचा सरकारच्या निर्णयाला लोकसभेने मंजूरी दिली. हा कालावधी वाढविल्यानंतर एका आठवड्यामध्ये भाजपा आणि बसपा यांनी परस्पर सहकार्य करुन 21 मार्च 1997 साली राष्ट्रपती शासन समाप्त करुन मायावती यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घतली. दोन्ही पक्षाच्या करारानुसार 21 सप्टेंबर 1997 ला बसपाने पाठिंबा काढून घेतल्याने कल्यानसिंह सरकार संकटात आले. राज्यपाल रमेश भंडारी यांनी दोन दिवसात सभाग्रहात बहूमत सिद्ध करुन दाखविण्याचा आदेश दिला. या दोन दिवसात काँग्रेस मधील 19 सदस्यांनी वेगळ्या उत्तरप्रदेश लोकशाही काँग्रेसचे संघटन करुन आणि जनता दलाचे 3 सदस्य वेगळे होवून त्यांनी कल्यानसिंहांना पाठिंबा दिला. या फोडाफोडीच्या राजकारणाला काँग्रेस अध्यक्ष सिताराम केसरी त्रासुन गेले होते. 22 ऑक्टोबर 1997 ला सभागृहात कार्यवाही सुरु झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात हिंसा आणि मारामारीमध्ये कल्याणसिह सरकारने बहूमतसिद्ध केले. या नंतरही राज्यपाल रमेश भंडारींच्या अहवालानूसार केंद्रीय मंत्रीमंडळाची इच्छा नसताना केवळ केंद्रातील संयुक्त मोर्चा सरकारला काँग्रेसचा बाहेरुन पाठिंबा असल्यामुळे सीताराम केसरींच्या दबावामुळे कलम 356 अंतर्गत राष्ट्रपती शासन लागू करण्याची सिफारस केला. परंतु राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या शिफारशीवर सहमत झाले नाहीत, तो निर्णय फेर विचारासाठी मंत्रीमंडळाकडे पाठवीला. दुसऱ्या दिवशी मंत्रीमंडळाने शिफारशीवर पुनर्विचार केला, परंतू राष्ट्रपतीकडे पून्हा तो निर्णय पाठविला नाही. त्यामुळे कल्याणसिंह सरकार जाता जाता टिकले. यावेळी कल्याणसिंहाच्या मंत्रीमंडळातील मंत्र्यांची संख्या 93 होती कारण अनेक विद्रोही आमदारांनी त्यांना पाठिंबा दिला होता.[10] अशाप्रकारे राष्ट्रपतींनी आपल्या संवैधानिक अधिकारांचा वापर करुन केंद्रशासनाकडून कलम 356 चा होणारा दुरुपयोग थांबविला.

पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या 6 वर्षाच्या कालखंडात गोवा, मणिपूर, बिहार आणि उत्तरप्रदेश या चार राज्यात राष्ट्रपती राजवटीचा प्रयोग झाला. गोव्यात फेब्रुवारी 1999 मध्ये राष्ट्रपती शासन लागू करण्यात आले. तेथे स्थिर सरकारचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे राष्ट्रपती शासन लागू करण्यात आले. पूढे तिथे निवडणूका घेवून घटनात्मक संकट समाप्त करण्यात आले. बिहारमध्ये राबडी देवी सरकार पदच्यूत करुन कलम 356 अंतर्गत तेथे राष्ट्रपती शासन लागु करण्याची केंद्रसरकारची शिफारस राष्ट्रपती के. आर. नारायण यांनी पुनर्विचारासाठी पाठवून घटनात्मक मूल्यांचे संरक्षण केल्याचे आणखी एक उदाहरण दाखवून दिले. विधानसभेत राबडी देवी सरकारला स्पष्ट बहुमत असताना कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली राष्ट्रपती शासन लागू करण्यासाठी मंत्रीमंडळाने 22 सप्टेंबर 1998 ला सिफारस केली होती. मात्र राष्ट्रपतींनी 25 सप्टेंबरला घटनात्मकतंत्र कोलमडले नसल्याचे स्पष्ट करुन हा निर्णय परत पाठवला. 26 सप्टेंबर 1998 ला मंत्रीमंडळाने पून्हा आपली सिफारस न पाठविण्याचा निर्णय घेतला. पून्हा दुसऱ्यावेळस राष्ट्रपतीला बिहार मध्ये राष्ट्रपती शासन लागू करणारी 11 फेब्रुवारी 1999 ची आधिसुचना 8 मार्च 1999 ला परत घ्यावी लागली. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सिफारशीने राष्ट्रपती शासन समाप्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकार एखाद्या राज्यातील राष्ट्रपतीशासन लागू केलेली अधिसुचना परत घेणे ही देशातील पहीलीच घटना होय. तेथे राष्ट्रपती शासन लागु करण्यात आले होते. लोकसभेनेही मंजूरी दिली होती. मात्र राज्यसभेत केंद्र शासनाला पाठिंबा मिळू शकला नाही. त्यामुळे राबडीदेवी सरकार पून्हा स्थापण करावे लागले. येथे एक नवीन स्थिती निर्माण झाली कारण सरकार लोकसभेच्या प्रति उत्तरदायी असते. 9 मार्च 1999 ला राज्यपाल सुंदरसिंह भंडारी यांना राबडी देवींना मुख्यमंत्रीपदाची शपथ द्यावी लागली सन 2001 मध्ये मणिपूर मध्ये राष्ट्रपती शासन लागू करण्यात आले होते, कारण मुख्यमंत्री राधाविनोद कोइजाम यांचे समता पार्टीचे सरकार अल्पमतात आले होते.[11] ते विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यास अपयशी ठरले होते. राज्यपाल श्री. वेद मारवाह यांनी रार्ष्टपतीला अहवाल पाठवला की, राज्यात कोणताही पक्ष स्थिर सरकार देवू शकत नाही. मणिपूर मध्ये 7 मे पासून राजकीय संकट निर्माण झाले होते. 6 मंत्र्यांसहीत 32 आमदारांनी मुख्यमंत्री यांचा पक्ष सोडून भाजपचे आर. के. दोरेंद्र सिंह यांच्या सोबत आले होते. हे दोन्ही पक्ष केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचे घटक होते. दुसरीकडे सरकार बनविण्यासाठी समर्थन देत नव्हते. शेवटी केंद्र सरकारने भाजपा नेत्याला सरकार बनविण्यापासून थांबविले आणि विवादाची सोडवणूक करण्यासाठी राष्ट्रपती शासन लागू करण्यात आले. राज्य विधानसभेच्या निवडणूकी नंतर 4 मार्च 2002 ला ओकरम इबोबीसिंह यांच्या नेतृत्वातील नवीन सरकार स्थापण झाले आणि राष्ट्रपती शासन समाप्त केले गेले. फेब्रुवारी 2002 मध्ये उत्तरप्रदेशात संपन्न झालेल्या विधानसभा निवडणूकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहूमत मिळाले नाही. समाजवादी पक्ष सर्वात मोठा पक्ष असला तरी तो बहूमताजवळ जाणार नव्हता. त्यामुळे राज्यपाल विष्णुकांत शास्त्री यांच्या अहवालाच्या आधारावर 8 मार्च 2002 ला उत्तर प्रदेशात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आणि नवनिर्वाचित विधानसभा अनिश्चित काळासाठी निलंबीत केली गेली. 3 में 2002 ला मायावतीयांचे भाजप - बसप हे संयुक्त सरकार स्थापण झाल्यानंतर राष्ट्रपती राजवट समाप्त करण्यात आली.[12]

सलग 10 वर्षे पंतप्रधानपदी राहिलेल्या मनमोहनसिंग यांच्या काळात 11 वेळा राष्ट्रपती शासनाचा प्रयोग झाला. फेब्रुवारी 2005 मधील विधानसभा निवडणूकीनंतर बिहारमध्ये त्रिशंकू विधानसभा अस्तित्त्वात आल्याने कोणताही राजकीय पक्ष सरकार स्थापण करण्यासाठी बहूमतापर्यंत जावू शकत नव्हता. त्यामुळे राज्यपाल बुटासिंग यांनी 7 मार्च रोजी विधानसभा निलंबित ठेवून राष्ट्रपती शासन लागू केले. दोन महिण्याच्या नाट्यमय घडामोडी नंतर लोकजनशक्ती पार्टी सोडून 22 आमदार संयुक्त जनता दलात सामिल झाले. नितीशकुमारांना पाठिंबा दिला. मात्र राज्यपालांनी त्यांना सरकार स्थापण करण्यासाठी आमंत्रीत केले नाही. त्यांच्यावर आमदार फोडणे, त्यांना लाचलुचपत देणे आणि पैशाचा गैरवापर करणे असे आरोप करुन तसा अहवाल राष्ट्रपतीला पाठविल्यामुळे राष्ट्रपतींनी 23 मे 2005 ला राज्यात पून्हा राष्ट्रपती शासन लागू केले आणि विधासनभा देखिल बरखास्त करण्यात आली, हा निर्णय राजकीय हेतूने प्रेरित होता. सर्वोच्च न्यायालयाने ही घटना असंवैधानिक ठरविली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे संयुक्त जनता दलाने राज्यपालाला परत बोलावण्याची मागणी केली. माजी निर्वाचन आयुक्त कृष्णमुर्ती यांनी राज्यपालाच्या सिफारशीला असंवैधानिक संबोधले. जेंव्हा विधान सभेचे गठणच करण्यात आले नाही तर भंग कशी करता येवू शकते.[13] बिहार विधानसभा भंग करण्याची घोषणा करताना गृहमंत्री शिवराज पाटील यांनी म्हटले की राज्यात विधानसभा सदस्यांची चाललेली खरेदी व फोडाफोड थांबविण्यासाठी असा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र लोकजन शक्ती पार्टीच्या 22 आमदारांनी नितीश कुमारांना पाठींबा दिल्यामुळे सरकार स्थापण करण्याच्या प्रक्रीयेला वेग आला होता. तेव्हा केंद्रीय ग्रहमंत्र्यांनी राज्यपालांकडून अहवाल मागवून घेतला आणि रविवारी रात्री 11 वाजता मंत्री मंडळाच्या बैठकीत विधानसभा भंग करुन राष्ट्रपती शासन लागू करण्याचा निर्णय घेतला. मास्को दौऱ्यावर असलेले राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्याकडून रात्री तीन वाजता ह्या निर्णयावर स्वाक्षरी घेतली गेली, ही घटना सामान्य माणसापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्वांनाच आर्श्चजनक वाटली.[14] सर्वोच्च न्यायालयाने आपल्या

निवेदनात असे म्हटले की, जर सरकारने सरकारीया आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केली असती तर न्यायालयाचा महत्त्वपूर्ण वेळ ह्या घटनेवर गेला नसता.[15] राज्यपाल बुटासिंह यांनी मात्र आपला निर्णय योग्य व लोकशाहीच्या रक्षणासाठी घेतल्याचे म्हटले. बिहारमध्ये आमदार खरेदीची सुचना सरकारला नियमित मिळाली, बंदुकीच्या धाकावर अनेक आमदारांना ठेवण्यात आले होते, त्यांना पैसा व अन्य प्रलोभने देवून खरेदी करण्याचा प्रयत्न चालू होता. तेंव्हा लोकशाहीला बदनाम करणाऱ्या या घाणेरड्या खेळाला थांबविण्यासाठी दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता.[16] डाव्या पक्षांनीही बिहार विधानसभा भंग करण्याचे समर्थन केले होते. बिहार घटनाक्रमावरुन असे दिसते की राज्यपाल केंद्राचे एजंट आणि ज्या पक्षाकडून नेमणूक झाली आहे. त्या पक्षाच्या हिताचे निर्णय घेतात. बिहारचा निर्णय राजकीय हेतूने प्रेरित होता. जरी आमदारांच्या खरेदीचा आरोप असला तरी राजयपालांनी कोणताही पुरावा सादर केला नाही. लोकजनशक्ती पार्टीचे आमदार जर रामविलास पासवानांना अध्यक्ष मानायला तयार नाहीत तर समर्थन देण्यास त्यांना खरेदी करण्याची गरज काय ? तसेच केंद्रीय मंत्रीमंडळाने मध्यरात्री अतिघाईने निर्णय घेणे कितपत योग्य आहे. तसेच नितीश कुमार यांच्या पाठीमागे बहुमत सिद्ध करण्याचे सामर्थ्य असताना त्यांना सरकार बनविण्यासाठी आमंत्रीत न करणे योग्य नव्हते. मुख्य निर्वाचन आयुक्तांच्या मताप्रमाणे विधानसभेचे गठण करण्याच्या अगोदरच बरखास्त करणे असंवैधानिक ठरते. बिहारच्या वादग्रस्त प्रकरणानंतर युपीए सरकारने कर्नाटक राज्यात कलम 356 चा प्रयोग केला. कर्नाटकचे मुख्यमंत्री एच. डी. कमार स्वामी व त्यांचा पक्ष धर्मनिरपेक्ष जनता दल भाजपाशी राजकीय करार करुन सत्तेवर आले होते. राजकीय करारानुसार मुख्यमंत्री कुमार स्वामी यांनी मुख्यमंत्री पद सोडण्यास नकार दिला. तेंव्हा राज्यपाल सोमेश्वर ठाकूर यांच्या शिफारसीनुसार 9 ऑक्टोबर 2007 ला राष्ट्रपती शासन लागू केले आणि विधानसभा निलंबीत केली. पुन्हा दुसऱ्यांदा 19 नोव्हेंबर 2007 ला मुख्यमंत्री येदियुरप्पा यांनी विधान सभेत बहूमत सिद्ध करण्याअगोदरच राजीनामा दिला आणि 20 नोव्हेंबर 2007 ला कर्नाटक मध्ये सात दिवसानंतरच राष्ट्रपती शासन लागू केले. येदियुरप्पा यांच्या राजीनाम्याने दक्षिण भारतात भाजपाचे सात दिवसात सरकार पडणारे पाहिलेच राज्य ठरले. प्रथम धर्मनिरपेक्ष जनता दलाने भाजपाल बिनशर्त पाठींबा देण्याचे मान्य करुनही नंतर सशर्त पाठिंबा जाहिर केला. मात्र भाजपाने तो नाकारला. नागालँड मधील राजकीय अस्थिरतेचा परिणाम म्हणून 3 जानेवारी 2008 ला नागालँड मध्ये राष्ट्रपतीशासन लागू केले गेले. झारखंड विधानसभेच्या निवडणूकीनंतर विधानसभेचे सदस्य नसताना झारखंड मुक्ती मोर्चाचे श्री शिबुसोरेन यांना मुख्यमंत्री केले गेले. मात्र सोरेन यांचा तेथील विधानसभेच्या पोटनिवडणूकीत पराभव झाला. अशा स्थितीत निर्माण झालेल्या राजकीय अस्थिरतेचा सामना करण्यासाठी 19 जानेवारी 2009 ला राष्ट्रपती शासनाची घोषणा करण्यात आली, दुसऱ्यांना 30 मे 2010 ला झारखंड मधील राजकीय अस्थिरेमुळे आणि बहुमत गमावल्यामुळे शेवटी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांनी राजीनामा दिला. तेथे पर्यायी सरकारची शक्यता नाही हे पाहून राज्यपालाच्या अहवालानंतर राज्य विधानसभा निलंबित ठेवून 1 जुन 2010 ला पुन्हा राष्ट्रपती शासनाची घोषणा केली गेली कारण भाजपा-झामुमो यांच्यातील मतभेदामुळे भाजपाने पाठिंबा काढून घेतला होता. पूढे या दोन्ही पक्षाच्या सहकार्याने भाजपाचे अर्जून मुंडा मुख्यमंत्री झाले. मात्र झामुमोने त्यांच्या पाठिंबा काढून घेतल्याने सरकार अल्पमतात आले आणि मुख्यमंत्री अर्जुन मुंडा यांनी राजीनाम देवून विधानसभा भंग करण्याची शिफारस केली. अशा स्थितीत 18 जाने 2013 ला झारखंड मध्ये राष्ट्रपती शासन लागू केले गेले. मार्च 2009 मध्ये मुख्यमंत्री दानकुंवर रॉय यांना सरकारने सभागृहाचा विश्वास गमावल्याच्या वादातून राजीनामा द्यावा लागला. यावेळी 17 मार्च 2009 ला घेतलेल्या विश्वासदर्शक ठरावावर 27-27 एवढी समसमान मते मिळाल्याने विधानसभेच्या सभापतींनी निर्णायक मत देवून सरकार बहूमतात आणले. मात्र याचेवळी 5 आमदारांनी सरकारचा पाठिंबा काढून घेतल्याने सभापतींनी त्यांना निलंबित ठेवून राज्यपाल आर. एस. मुसाहारी यांनी राष्ट्रपती शासनाची शिफारस केली आणि 18 मार्च 2009 ला राष्ट्रपती शासन लागू केले गेले.

विभिन्न सरकारच्या कार्यकाळात कलम 356 च्या प्रयोगांच्या उपरोक्त घटनांच्या आढावा घेतला असता असे लक्षात येते की, घटनात्मक व्यवस्थेचे रक्षण करण्यासाठी काही वेळा कलम 356 चा प्रयोग झाला. मात्र उपरोक्त उल्लेखित बहुतांश राष्ट्रपती शासनाच्या घोषणा ह्या राजकीय निर्णयाने प्रेरित होत्या. न्या. सरकारिया आयोगाने आपल्या अहवालात राष्ट्रपती शासनाच्या घटनांवर असे म्हटले की, विधानसभेत बहूमत असताना 13 वेळा राष्ट्रपती शासनाचा प्रयोग झाला, 15 घटनांमध्ये मंत्रीमंडळाने राजीनामा दिला होता, मात्र अन्य पक्षांना सरकार स्थापण करण्याची संधी दिली नाही किंवा विधान सभेत बहूमत सिद्ध करण्याची संधी दिली नाही. आयोगाने केवळ 26 राष्ट्रपती शासनाच्या घटना अपरिहार्य होत्या असे नमुद केले.[17] याचा अर्थ आयोगाच्या अहवालानंतरही फारसा फरक पडला नाही कलम 356 चा दुरुपयोगाच्या घटना सुरुच राहिल्या. न्यायालयानेही या घटनांवर आक्षेप घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कलम 356 च्या दुरुपयोगाच्या शक्यतेविषयी संविधान समितीमध्ये असे म्हटले की, कलम 356 चा वापर राजकीय हेतू साध्य करण्यासाठी केला जाण्याची शक्यता आहे, ही गोष्ट नाकारता येत नाही.[18] डॉ. आंबेडकरांची शंका पूढील राजकीय वाटचालीत सत्य ठरली. घटनासमितीचा कलम 356 बाबत व्यापक दृष्टीकोन होता, घटनाकारांनी राष्ट्राची सुरक्षितता, एकता आणि अखंडत्त्वाचे संरक्षण, असाधारण परिस्थितीत घटनात्मक यंत्रणा अबाधित ठेवण्याचा व्यापक हेतूने कलम 356 चा अंतर्भाव संविधान केला. संविधान निर्मित्यांनी कलम 356 कडे घटनात्मक यंत्रणेचे सुरक्षा कवच म्हणून बघीतले मात्र प्रत्यक्षात हे कलम विरोधी पक्षांची राज्य सरकारे बरखास्त करण्याचे साधन ठरले आहे. 1989 नंतर राष्ट्रपती शासनांच्या घटनाची संख्या कमी असली तरी दुरुपयोग मात्र थांबला नाही. हे केंद्र - राज्य सहयोगासाठी उचित नाही.

### कलम 356 बाबत न्यायालयाचा दृष्टीकोन :-

कलम 356 च्या दुरुपयोगाबाबत शक्यता लक्षात येवूनही घटनाकारांनी एक अनिवार्यता म्हणून या कलमाचा अवलंब केला. राज्यपालांच्या अहवालाच्या आधारावर सर्व शक्यतांची पडताळणी झाल्यानंतर केंद्र सरकार संबंधीत घटकराज्यांच्या घटनात्मक यंत्रणेचे रक्षण करण्यासाठी राष्ट्रपती शासनाची राष्ट्रपती मार्फत घोषणा केली जाते. मात्र कलम 356 नुसार झालेली कार्यवाही न्याय योग्य आहे किंवा नाही यावरुन प्रारंभी मतभेद होते. सर्वप्रथम के. के. अबू विरुद्ध भारत सरकार या खटल्यात केरळ उच्च न्यायालयाने राष्ट्रपती शासनाच्या घोषनेची वैधता तपासण्याचा विचार केला, तेंव्हा न्यायालयाने संबंधीत याचिका रद्द करुन आणिबाणीच्या घोषणेची न्यायीक समिक्षा करता येत नाही असा निर्णय दिला. 1967 मध्ये पंजाब-हरियाणा उच्च न्यायालय, 1973 मध्ये कलकत्ता उच्च न्यायालय, 1974 मध्ये आंध्रप्रदेश उच्च न्यायालय आणि ओरिसा उच्च न्यायालयाने देखिल केरळ उच्च न्यायालयासारख निर्णय दिला होता.

सन 1977 मध्ये केंद्रातील इंदिरा गांधी यांच्या सरकारचा दारुण पराभव झाला. यावेळी काँग्रेस शासीत नऊ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना जनता सरकार मधील केंद्रीय गृहमंत्री यांनी 17 एप्रिल, 1977 ला एकपत्र लिहून तेथील राज्यपालांना विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला द्यावा असे सांगीतले. त्यानंतर

न्यायमंत्र्यांनी या 9 राज्यातील सरकारने जनमत गमावल्याचे कारण देवून राष्ट्रपती द्वारा आणिबाणिची घोषणा केली. यापैकी सहा राज्यसरकारांनी विधानसभा भंग करण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयातील सात न्यायाधिशांच्या संविधान पीठाने असा निर्णय दिला की, कलम 356 मधील तरतूदीनुसारची कार्यवाही यात केवळ राजकीय प्रश्न असतो आणि त्यामुळे न्यायालयाला त्यावर निर्णय देता येत नाही आणि ही बाब मान्यही करता येत नाही. कलम 356 च्या गैरवापरामुळे राजकीय प्रश्नाबरोबर संवैधानिक प्रश्नही निर्माण होतात हे प्रथम न्यायालयाने मान्य केले. अर्थात कलम 356 नुसार कार्यवाहीच्या निर्णयाचे न्यायीक पूनरावलोकन करता येते असा निर्णय दिला. 6 डिसेंबर 1992 ला आयोध्या प्रकरणाचा परिणाम म्हणून उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेशातील राज्यसरकारांना बरखास्त करुन विधानसभाभंग केल्या गेल्या. हा निर्णय 1977 मधील निर्णयाचा प्रतिनिर्णय समजला गेला. राष्ट्रपतींच्या या घोषणेला मध्यप्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेशच्या उच्चन्यायालयात आव्हान दिले गेले. मध्यप्रदेशच्या उच्च न्यायालयाने राष्ट्रपती शासनाचा निर्णय अवैध आणि असंवैधानिक ठरवून असे म्हटले की, कलम 356 मधील तरतूदींचा असंवैधानिक वापर करुन राज्यात राष्ट्रपती शासन लागू केले, राष्ट्रपती शासनाच्या घोषणेला संसदेची मान्यता घेतली म्हणजे अवैध निर्णय वैध ठरत नाही.[19] मध्यप्रदेश उच्य न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध केंद्रसरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल कले. सर्वोच्च न्यायालयाने देशातील विभिन्न उच्च न्यायालयांमध्ये दाखल असलेल्या याचिका आपल्याकडे मागवू घेतल्या. राजस्थान, हिमाचल प्रदेश, नागालँड, कर्नाटक येथील उच्य न्यायलयात प्रलंबित असणारे वादही स्वत:कडे हस्तांतरीत करुन घेतले. त्यासाठी सर्वोच्चन्यायालयाने 9 सदस्यांचे एक संवैधानिक पीठ गठीत करुन त्यावर निर्णय दिला. हा खटला एस. आस. बोलई विरुद्ध केंद्र सरकार या नावाने ओळखला जातो.[20] या खटल्यात सर्वोच्य न्यायालयाने असा निर्णय दिला की, कलम 356 अंतर्गत राज्यात राष्ट्रपती शासन लागू करणे आणि विधानसभा भंग करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार निरंकूश नसून तो सशर्त आहे. तो अधिकार न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिन आहे. जर विधानसभा भंग करण्याची घोषणा अवैध सिद्ध झाल्यास न्यायालय विधानसभा पुर्नजिवित करु शकते. न्यायालयाने आपल्या निर्णयात 6 डिसेंबर 1988 मध्ये नागालँड, 1989 मध्ये कर्नाटक आणि 1991 मधील मेघालयातील राष्ट्रपती राजवट व तेथील विधानसभा भंग करणे असंवैधनिक मानले मात्र या राज्यातील नवीन विधानसभांच्या निवडणूका झाल्याने आता जूनी विधानसभा अस्तित्त्वात आणता येणार नाही असे ही नमुद केले.

न्यायमुर्ती पी. बी. जिवन रेड्डी यांनी म्हटले की, राज्यातील राष्ट्रपती शासनाच्या घोषणेचे न्यायीक पुनरावलोकन केले जावू शकते आणि जर ही घोषणा असंवैधानिक सिद्ध झाली तर भंग केलेली विधानसभा पुर्नजिवित केली जावू शकते. या खटल्यात न्यालयाने राजस्थान सरकार विरुद्ध भारत सरकार या खटल्यात दिलेल्या निर्णयाचेच अनुसरुन केले. न्यायालयाने म्हटले की, राष्ट्रपती शासन लागू केल्याबरोबर विधानसभा भंग करता येणार नाही. कारण संसदेने मान्यता दिल्यानंतरच विधानसभा भंग करता येते त्या आधी नव्हे. जो पर्यंत संसदेची मान्यता मिळत नाही तो पर्यंत राष्ट्रपती विधानसभा निलंबित करु शकतात. कलम 72 (2) च्या संदर्भात न्यायालयाने म्हटले की, मंत्रीपरिषदेने राष्ट्रपतीला दिलेला सल्ला गोपनिय असला तरी तो ज्या आधारावर दिला आहे, त्याची न्यायालय चौकशी करु शकते. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतीशासन लागू करण्यासंबंधी मापदंड निश्ति केले, ज्याचे पालन केंद्र सरकारसाठी अनिवार्य आहे ते मापदंड असे .

1) कलम 356 नुसार राष्ट्रपतीला एखाद्या राज्यात राष्ट्रपती शासन लागू करणे आणि विधानसभा भंग करण्याचा अधिकार अमर्याद नसून मर्यादित आहे. अशा घोषणेपूर्वी कलम 356 (1) नुसार राज्यात परिस्थिती अस्तित्तवात होती हे स्पष्ट करावे लागेल.
2) राष्ट्रपती अशी घोषणा राज्यपालाच्या लिखित अहवालाशिवाय लागू करणार नाहीत.
3) धर्मनिरपेक्षता भारतीय संविधानाचा मुलभूत आधार आहे आणि जर एखादे सरकार धर्मनिरपेक्ष आदर्शांच्या विरुद्ध काम करत असेल तर कलम 356 नुसार कार्यवाही करता येईल.
4) विरोधी पक्षांचे सरकार असलेली राज्यसरकारे एकाच वेळी बडतर्फ करू नयेत.
5) जर राजकीय हेतूने प्रेरित होवून राष्ट्रपती शासन लागू केले तर न्यायालय अशा राज्यातील विधानसभेचे पुनर्गठन करील.
6) राष्ट्रपती शासनाची घोषणा आणि विधान सभा भंग करणे हया क्रिया एकाच वेळी करता येणार नाहीत, संसदेच्या अनुमोदनानंतरच राष्ट्रपती विधानसभा भंग करतील. जर संसदेने अनुमोदन दिले नाही तर राष्ट्रपती विधानसभा केवळ निलंबित करू शकतात.
7) सर्वोच्च आणि उच्च न्यायालय केंद्र सरकारकडे राष्ट्रपतीना ज्या आधारावर राष्ट्रपती शासन लागू करण्याचा सल्ला दिला ते आधार विचारू शकते.
8) एखाद्या राजकीय पक्षाला भक्कम बहुम मिळणे याचा अर्थ विरोधी पक्षांची सरकारे बडतर्फ करणे असा होत नाही.

सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त मापदंड प्रमाण मानून कलम 356 बाबत कारवाई व्हावी जर राजकीय द्वेष भावनेतून राष्ट्रपती शासन लागू केले तर न्यायालय ते अवैध घोषित करेल. नागालँड, कर्नाटक आणि मेघालय या राज्यात लागू केलेले राष्ट्रपती शासन न्यायालयाने ठोस आधाराच्या अभावी अवैध घोषित केले. न्यायालयाच्या मते हा कलम 356 चा दुरूपयोग होता.

एस.आर. बोम्मई खटल्यातील निर्णयासारखाच निर्णय सर्वोच्च न्यायालयाने 2005 मध्ये बिहार विधानसभा भंग करणे व तेथील राष्ट्रपती शासनाला आव्हान देणाऱ्या रामेश्वर प्रसाद विरूध्द भारतीय संघ या खटल्यात दिला. 23 मे 2005 रोजीचा बिहारमधील राष्ट्रपतीशासन आणि विधानसभा भंग करण्याचा निर्णय असंवैधानिक ठरवला. न्यायालयाने केंद्र सरकार आणि राज्यापालवर आक्षेप घेताना म्हटले की, राज्यपालांची कृती लोकशाहीसाठी घातक आहे. न्यायालयाच्या कडक भूमीकेनंतर पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी न्यायालयाच्या निर्णयाचे पालन केले जाईल अशी हमी दिली. मात्र राज्यपालांनी राजीनामा देण्यास नकार दिला. कोणत्याही सबळ आधाराशिवाय बिहार विधानसभा भंग केली गेली, राज्यपालांनी केंद्र सरकारला योग्य अहवाल दिला नाही, त्यांनी नैतिकता पाळली नाही. त्यामूळे राज्यपालांची भूमिका असंवैधानिक ठरते. न्यायालयाने आपल्या निर्णयात राज्यपालांना दोषी ठरवितानाच मंत्रीमंडळाने ही राज्यपाल चा प्रस्ताव स्विकारण्या अगोदर वस्तूस्थिती जाणून घेणे आवश्यक होते असे म्हटले. त्रिशंकु विधानसभेत संयुक्त जनता दलाचे सरकार बनू नये या राजकीय हेतून राज्यपालांनी विधानसभा भंग करण्याचा घाईने निर्णय घेतला. राज्यपालांनी केंद्राकडे पाठविलेला अहवाल अप्रामाणिक आणि काल्पनिक तथ्यावर आधारित होता. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने कलम 356 च्या दुरूपयोगाविषयी म्हटले कि, राजभवन केंद्रसरकारचे प्रादेशिक कार्यालय म्हणून काम करत आहे, त्यामूळे कलम 356 चा दुरूपयोग थांबविण्यासाठी न्या.सरकारीया आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी न्यायालयाला आवश्यक वाटते.[21]

कलम 356 च्या प्रयोगाचे तांत्रिक विवेचन त्यात पर्याप्त सुधारणांची आवश्यकता असल्याचे सुचविते. भारतातील भाषिक, धार्मिक, प्रादेशिक विविधतेमुळे संघराज्यांतर्गत मजबूत केंद्र सरकारची आवश्यकता असल्यामूळे संघात्मक व्यवस्थेबद्दल ताठर भूमिका घेणे उचित ठरत नाही. मात्र केंद्राच्या मजबूतीबरोबरच राज्यांची स्वायततःाही महत्त्वाची आहे. यात संतुलन राखण्याची महत्त्वाची भूमिका राज्यपालांनी पार पाडली पाहिजे. राज्यापालांच्या अहवालाच्या आधारावच कलम 356 चा प्रयोग अवलंबून असतो. खरोखरच सवैधानिक व्यवस्था कोलमडली असेल तरच कलम 356 चा प्रयोग व्हावा. कलम 356 च्या प्रयोगाचे न्यायीक पुनरावलोकन होवू शकते हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामूळे आशा आहे की, भविष्यात या कलमाचा वापर करताना सावधानता बाळगली जाईल. मात्र एस.आर. बोम्मई पकरणानंतर 2005 मध्ये बिहार प्रकरण घडले. न्यायालय ही घटना अवैध ठरवेल हे माहित असतानाही केंद्रसरकारने हे पाऊल उचलले. कारण कलम 356 ची घोषणा व न्यायालयीन निर्णय या दरम्यानच्या काळात राजकीय लाभ केंद्र घेवू शकते. दुसरीकडे या घटनेचे न्यायीक परीक्षम होणे देखील आदर्श स्थिती मानता येणार नाही. जर समजा न्यायालयाने राष्ट्रपतीशासनाच्या निर्णयाला स्थगिती दिली आणि नंतर न्यायीक दृष्टयाही घटना उचित ठरली तर दरम्यानच्या काळात अयोग्य सरकार सत्तेवर राहिल. अन्य स्थिती अशी निर्माण होईल की, न्यायालयाने कोणताही आदेश दिला नाही आणि नंतर राष्ट्रपती शासनाची घोषणा न्यायालयाने अवैध ठरली तर बरखास्त केलेले सरकार पून्हा सत्तारूढ होईल, यावर राजकीय द्वेष वाढत जातील शिवाय न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत राज्यसरकारवर टांगती तलवार कायम राहिल. मात्र याचा अर्थ न्यायीक परीश्रण होवू नये असे करणे योग्य ठरणार नाही. कारण कलम 356 च्या निरंकूश वापरावर न्यायीक नियंत्रण अनिवार्य आहे. अशा दुहेरी स्थितीत समस्येचे स्थायी समाधान शोधण्याची गरज आहे. यातून दोन पर्याय समोर येतात पहिला पर्याय असा की कलम 356 संविधातून काढून टाकावे आणि दुसरापर्याय त्यात उपयुक्त संशोधन करावे, आणि भविष्यात जसजशा समस्या येतील त्यानुरूप संशोधन व्हावे. जर या पर्यायावर गाभिर्याने विचार झाला नाही तर केंद्र राज्य यांच्यातील वाद वाढत जातील जे सहयोगी संघवादासाठी घातक ठरेल.

**संदर्भ :-**


1. Constitutional Assembly Debet. Vol. IX, P. No. 133, 177.
2. वर्मा एस. एल., शर्मा ब्रिजमोहन, भारत में संवैधानिक अपतकाल. रावत पब्लीकेशन जयपुर, 1998, पृ. क्र. 80.
3. केशवी राजे सिंह,"श्री नरसिंहराव सरकार के कार्यकाल में केंद्र-राज्य संबध " डी.फिल उपाधि के लिए शोधप्रबंध, इलाहाबाद विश्वविद्यालय, इलाहाबाद, 2002 पृ.क्र. 236
4. उपर्युक्त क्र. 2, पृ. क्र. 81
5. कित्ता पृ. क्र. 84
6. उपर्युक्त क्र. 2, पृ. क्र. 86
7. A.I.R. 1977, SC 1361
8. उपर्युक्त क्र.3, पृ. क्र. 268
9. उपर्युक्त क्र. 2, पृ. क्र. 96
10. कित्ता पृ. क्र. 97
11. नेमा जी. पी., जैन श्रीमती राजेश, शर्मा हारिश्चंद्र, भारत में. राज्यों की, राजनिती, कॉलेज बुक डेपो, जयपुर, 2004, पृ.क्र. 624, 625.
12. डॉ. बी. एल. फडिया, कुलदीप फडिया, भारतीय संघराज्य व्यवस्था, एवं केंद्र राज्य संबंध, कैलास पुस्तक सदन भोपाळ, 2010, पृ. क्र. 524.
13. पंजाब केसरी,दिल्ली, 25 मे 2005 पृ. क्र. 1-5
14. Times Of India, Patna, 23 May 2005
15. कित्ता
16. दैनिक भास्कर, दिल्ली, 24 मे 2005 पृ. क्र. 1-10
17. Center - State Relation Report Part 1 (1988) P.No. 177
18. C.A.D. VOL- IX P.no. 177
19. A.I.R. 1977 SC 1361
20. A.I.R. 1994 SCC 1918, 11 March 1994
21. Patna Law Journal Report (PLJR) 2006, P.No. 312-321




**प्रा. डॉ. ढोबळे डी. बी.**

सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग , श्री छ.शिवाजी महाविद्यालय उमरगा.